# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 28/08/2020 (शुक्रवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर मौजा रानबोडी येथे दिनांक 23/08/2020 चे 22.00 वा. ते दिनांक 24/08/2020 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– इंदुबाई भगवान फुकट, वय 50 वर्ष, रा. रानबोडी यांचे राहते घराचे दाराचे कुलुप कोंडा अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरातील स्वयंपाक खोलीतील डब्यात ठेवलेले सोन्याची गळसुळी किं. 45,000/–रु., नगदी 15,000/–रू. असा एकुण कि. 60,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक हरिष यंगलवार हे करीत आहे.

### विनयभंग

1) पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 24/08/2020 चे 15:30 वा. चे सुमारास फिर्यादी यांची मावस भावाची 5 वर्षीय पिडीत मुलगी हिला नुडल्स खाऊ घालत असतांना आरोपी नामे– राहुल रहांगडले, वय 25 वर्ष, रा. कळमेश्वर जि. नागपूर हा मोटार सायकलवर त्यांच्या जवळ आला त्यादरम्यान फिर्यादी हा पाणी आणण्याकरीता बाजुच्या ठेल्यावर गेला असता आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्यादरम्यान मुलीने आराडाओरड केल्याने फिर्यादीने त्याचा जाब विचारला असता आरोपीने फिर्यादीस हातबुक्कीने मारहाण करून शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 323, 504, 506 भादंवि. सहकलम 8, 10 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि चवरे 9867672244 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– दि. 24/08/2020 चे 11:30 वा. ते 14.30 वा. चे सुमारास 29 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि गावातील शेतामध्ये फवारणी करीता पाणी पुरविण्या करीता गेली असता फवारा मारणारा आरोपी नामे– पाडुंरंग शालीकराम चोपडे, वय 54 वर्ष, रा. टेंभुरडोह याने शेतात कुणीही नसल्याचे आजुबाजुला पाहुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ), 354(ब) भादंवि. सहकलम सहकलम 3(1) (व्ही ए) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री अशोक सरंबळकर सावनेर विभाग सावनेर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर